# बेरड समुदायातील बदलासंबंधीची माहिती

# प्रकरण सातवे
# बेरड समुदायातील बदला संबंधीची माहिती

## प्रस्तावना :

सामाजिक परिवर्तन म्हणजेच सामाजिक बदल होय. तेव्हा सामाजिक बदल हे सर्व मानवी समाजाचे एक महत्त्वाचे लक्षण आहे. अगदी प्रारंभीच्या साध्या समाजापासून ते प्रगत, औद्योगिक, आधुनिक संकीर्ण समजापर्यंत सर्वच आकारांच्या आणि प्रकारच्या समाजात सातत्याने बदल घडून आला आहे, येत आहे. विविध समाजातील बदलाची किंवा परिवर्तनाची गती व प्रमाण यात भेद असेल पण परिवर्तनच घडून येत नाही असा समाजच सापडणार नाही. आता समाज स्थिर असतो, समाजव्यवस्था टिकून राहते हे जरी खरे असले तरी समाज बदलत असतो. समाजव्यवस्थेत परिवर्तने घडून येतात हे ही तितकेच खरे आहे. स्थैर्य (Stability) आणि परिवर्तन (Change) ही मानवी समाजाची सापेक्ष अशी वैशिष्ट्ये आहेत. प्रत्येक समाज सापेक्षत: स्थिर तसाच सापेक्षत: गतिशील वा परिवर्तनशील असतो. तेव्हा भारतीय समाज याला कसा अपवाद असणार? आणि म्हणून भारतीय समाजातील ग्रामीण भागातील बेरड समाजही त्याला अपवाद ठरू शकत नाही.

भारतीय समाजाच्या संरचनेत गेल्या सुमारे दिडशे वर्षात प्रचंड परिवर्तन घडून आले आहे. याला अनेक कारणे जबाबदार आहेत. यामध्ये तंत्रविद्येचा विकास, औद्योगिकीकरण आणि नागरीकीकरण हे तीन घटक पारंपरिक समाजाच्या संरचनेत बदल घडून येण्यास मोठ्या प्रमाणात कारणीभूत ठरले आहेत. तसेच भौतिक परिस्थिती, लोकसंख्येतील बदल, सामाजिक-सांस्कृतिक घटक आणि प्रभावी व्यक्तीमत्त्वे हे ही कारणे तेवढीच जबाबदार असलेली दिसून येतात. या वरील कारणांमुळे भारतीय समाजात एकंदरीत भारतीय सामाजिक संरचनेवर अनेक परिणाम झालेले दिसतात. त्यात प्रामुख्याने सामाजिक संबंधात बदल, लोकांच्या व्यवसायात बदल, नव्या व्यावसायिक भूमिकांची वाढ, भूमिकांच्या विशेषीकरण आणि स्तरीकरण प्रक्रियेत वाढ, भौगोलिक, व्यावसायिक आणि सामाजिक गतिशिलतेत वाढ, स्तरीकरण व्यवस्थेत बदल, कुटुंबाच्या संरचनेत आणि कार्यात बदल, धर्मनिरपेक्षतेच्या प्रक्रियेत

वाढ, जनसंपर्क आणि प्रसारमाध्यमांच्यात वाढ, शिक्षणाचे सार्वत्रीकरण, राजकीय सत्तेचे केंद्रीकरण व नोकरशाहीत वाढ आणि सामाजिक समस्यात वाढ इत्यादी परिणाम किंवा वदल भारतीय समाज संरचनेत झालेला दिसतो.

वरील प्रकारचा परिणाम भारतीय समाजाच्या तिनही विभागामध्ये कमी-जास्त प्रमाणात आढळतो. जसे की शहरी समाज, ग्रामीण समाज आणि आदिवासी समाज. यापैकी शहरी समाजामध्ये सामाजिक परिवर्तनाच्या किंवा बदलाचा परिणाम जास्त परिणाम आढळतो तर ग्रामीण समाजामध्ये मध्यम प्रमाणात तर आदिवासी समाजामध्ये फारच कमी प्रमाणात सामाजिक परिवर्तनाचा किंवा वदलाचा परिणाम आढळतो तेव्हा ग्रामीण समाजामध्ये राहणाऱ्या वेरड समुदायावर या सामाजिक वदलाचा काही परिणाम झालेला आहे का? किंवा वेरड समुदायात काही वदल झाले आहेत का? वेरड समुदायामध्ये काही वदल झाल्यास नेमका कोणता वदल झाला आहे? तो कोणत्या घटकात? व किती प्रमाणात झाला आहे? याचा अभ्यास या प्रकरणामध्ये केलेला आहे.

**सारणी क्र. ७.१**

**बेरड समुदायातील काही बदल झालेचे दर्शविणारी माहिती**

| अ.क्र. | परिवर्त्य | उत्तरांचे प्रवर्ग | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | पूर्वी घरात कोणकोणत्या वस्तू होत्या? | रेडिओ, टेवल, खूर्ची, कपाट | ५० | १०० % |
| २ | सद्यपरिस्थितीत कोणत्या वस्तू आहेत? | टेपरेकॉर्डर, ट्यूवलाईट टी.व्ही., पंखा | ५० | १०० % |
| ३ | पूर्वी रेडिओ ऐकत होता का? | होय | ३४ | ६८ % |
| | | नाही | १६ | ३२ % |
| | | **एकूण** | ५० | १०० % |
| ४ | सद्यपरिस्थितीत ऐकता का? | होय | ६ | १२ % |
| | | नाही | ४४ | ८८ % |
| | | **एकूण** | ५० | १०० % |
| ५ | पूर्वी टी.व्ही. पहात होता का? | होय | ५ | १० % |
| | | नाही | ४५ | ९0% |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | एकूण | ५० | १०० % |
| ६ | सद्यपरिस्थितीत टी.व्ही. पहाता का? | होय | ४४ | ८८ % |
| | | नाही | ६ | १२ % |
| | | **एकूण** | ५० | १०० % |
| ७ | पूर्वी वर्तमानपत्र वाचत होता का ? | नाही | ५० | १०० % |
| ८ | सद्यपरिस्थितीत वाचता का? | होय | ३० | ६० % |
| | | नाही | २० | ४०% |
| | | **एकूण** | ५० | १०० % |
| ९ | पूर्वी तुमच्या गावात वाचनालय होते का ? | नाही | ५० | १०० % |
| १० | सद्यपरिस्थितीत गावात वाचनालय आहे का? | होय | ५० | १०० % |
| ११ | पूर्वी तुमच्या गावात वाहनांचे दळणवळण होत होते का? | नाही | ५० | १०० % |
| १२ | सद्यपरिस्थितीत होते का? | होय | ५० | १०० % |
| १३ | तुमच्या समुदायाचे शिक्षाचे स्वरूप कसे होते? | गंभीर | ५० | १०० % |
| १४ | सद्यपरिस्थितीत कसे आहे? | गुन्ह्याचे स्वरूप पाहून | ५० | १०० % |
| १५ | तुमचा नागरी जीवनासंबंधी दृष्टीकोन कसा आहे? | चांगला | ३३ | ६६% |
| | | वाईट | १७ | ३४ % |
| | | **एकूण** | ५० | १०० % |
| १६ | पूर्वी तुम्ही सामान्य सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये सहभागी होत होता का? | होय | ४१ | ८२% |
| | | नाही | ९ | १८ % |
| | | **एकूण** | ५० | १०० % |
| १७ | सद्यपरिस्थितीत सहभागी होता का? | नाही | ५० | १०० % |
| १८ | तुमच्या मते धार्मिक व्यवहार सण-उत्सव कार्यक्रम यावावतच्या दृष्टीकोनामध्ये सद्यपरिस्थितीत बदल झाला आहे का? | होय | ४० | ८० % |
| | | नाही | १० | २० % |
| | | **एकूण** | ५० | १०० % |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १९ | सद्यपरिस्थितीत तुमच्या मते राजकीय जाणिव आणि सहभाग यामध्ये वदल झाला आहे का? | होय | ५० | १०० % |
| २० | तुमच्या समुदायामध्ये नागरी जीवनामुळे कोणते फायदे झाले आहेत? | चांगले | ३१ | ६२ % |
| | | वाईट | १९ | ३८ % |
| | | **एकूण** | ५० | १०० % |
| २१ | पूर्वी तुमच्या समुदायामध्ये सामाजिक स्तरीकरणाचे स्वरूप कसे होते? | उत्पन्न | ५० | १०० % |
| २२ | सद्यपरिस्थितीमध्ये कसे आहे? | शिक्षण | ५० | १०० % |
| २३ | तुमच्या समुदायातील लोकांना गावातील उच्च वर्गातील लोकांच्या घरामध्ये प्रवेश दिला जात होता का? | नाही | ५० | १०० % |
| २४ | सद्यपरिस्थितीत प्रवेश आहे का? | होय | ५० | १०० % |
| २५ | तुम्ही पूर्वी सामाजिक मंडळाचे सदस्य होता का? | नाही | ५० | १०० % |
| २६ | सद्यपरिस्थितीत आहात का? | होय | ५० | १०० % |

वरील सारणी क्र.७.१ मध्ये मुलाखत अनुसूची व सामाजिक सर्वेक्षणाद्वारे वेरड समुदायातील काही वदल झाल्या विषयीची दिलेली माहिती ही वेरड समुदायातील वेरड उत्तरदात्यांची मते नोंदवून गोळा केलेली आहे. वरील माहितीमध्ये वेरड समुदायातील पूर्वीच्या परिस्थितीची व सद्यपरिस्थितीची तुलनात्मक आकडेवारी दिलेली आहे. तिचे विश्लेषण पुढीलप्रमाणे आहे.

## बेरड लोकांच्या घरातील वस्तू किंवा साहित्य :

पूर्वी वेरड समुदायातील लोकांच्या घरामध्ये रेडिओ, टेवल, खूर्ची, कपाट इत्यादी वस्तू असलेल्या आढळतात. तर सद्यपरिस्थितीत मात्र या वस्तूंची जागा टेपरेकॉर्डर, टयूवलाईट, टी.व्ही., पंखा इत्यादी वस्तूंनी घेतलेली आहे.

**बेरड समुदायांतील रेडिओ, टी.व्ही., वर्तमानपत्र आणि वाचनालय या प्रसारमाध्यमांचे स्थान :**

बेरड समुदायातील उत्तरदात्यांना, पूर्वी रेडिओ ऐकत होता का? असा प्रश्न विचारला असता उत्तरदात्यांनी दिलेल्या उत्तरादाखल माहितीवरून असे दिसून येते की पूर्वी वहुसंख्य (६८.0%) वेरड लोक रेडिओ ऐकत होते परंतु उर्वरीत (३२.0%) बेरड लोक मात्र रेडिओ ऐकत नव्हते. सद्यपरिस्थितीत रेडिओ ऐकता का? असा प्रश्न विचारला असता अशी माहिती मिळते की सद्यपरिस्थितीत वहुसंख्य (८८%) वेरड लोक रेडिओ ऐकत नाहीत तर उर्वरीत सर्वात कमी (१२.0%) वेरड लोक सद्यपरिस्थितीत रेडिओ ऐकतात.

पूर्वी वहुसंख्य (९0.0%) वेरड लोक टी.व्ही.पाहत नव्हते. तर उर्वरीत सर्वात कमी (१0.0%) बेरड लोक मात्र टी.व्ही. पाहत होते. सद्यपरिस्थितीचा विचार केल्यास वहुसंख्य (८८.0%) वेरड लोक टी.व्ही. पाहतात तर उर्वरीत (१२.0%) वेरड लोक सद्यपरिस्थितीत टी.व्ही.पहात नाहीत.

पूर्वी वेरड समुदायातील सर्वच बेरड लोक वर्तमानपत्रे वाचत नव्हते परंतु सद्यपरिस्थिती मात्र बहुसंख्य (६0.0%) वेरड लोक मात्र वर्तमान पत्र वाचतात परंतु उर्वरीत (४0.0%) वेरड लोक वर्तमानपत्र वाचत नाहीत. माणगांव गावात पूर्वी अभ्यासासाठी वाचनालये नव्हती परंतु सद्यपरिस्थितीत मात्र गावामध्ये वाचनालये, अभ्यास केंद्र उपलव्ध आहेत.

**दळण-वळणाची साधने :**

पूर्वीच्या परिस्थितीचा विचार केल्यास माणगांव गावात दळण-वळणाची साधने नसल्याची आढळतात तर सद्यपरिस्थितीत मात्र माणगांव गावात मोठ्या प्रमाण दळण-वळणाची साधने असल्याचे दिसते.

**बेरड समुदायातील शिक्षेचे स्वरूप :**

पूर्वी वेरड समुदायामध्ये एखाद्या व्यक्तीने कोणताही गुन्हा केल्यास त्या गुन्ह्याची शिक्षा ही गंभीर स्वरूपाची असल्याची आढळते. सद्यपरिस्थितीत मात्र वेरड समुदायातील शिक्षेचे

स्वरूप बदल्याचे दिसते. सद्या व्यक्तीने केलेल्या गुन्ह्याचे स्वरूप पाहून त्या व्यक्तीला शिक्षा दिली जाते.

### बेरड लोकांचा नागरी जीवनासंबंधीचा दृष्टीकोन :

बेरड समुदायातील लोकांना तुमचा नागरी जीवनासंबंधी दृष्टीकोन कसा आहे ? असा प्रश्न विचारला असता मिळालेल्या माहितीवरून असे दिसून येते की बेरड समुदायातील बहुसंख्य (६६%) बेरड लोकांच्या नागरी जीवनासंबंधीचा दृष्टीकोन चांगला आहे तर उर्वरीत (३४.0%) बेरड लोकांचा मात्र नागरी जीवना संबंधीचा दृष्टीकोन बाईट आहे.

### बेरड लोकांचा सामान्य सांस्कृतिक कार्यक्रमातील सहभाग :

पूर्वी बेरड समुदायातील बहुसंख्य (८२.0%) बेरड लोक सामान्य सांस्कृतिक कार्य क्रमामध्ये सहभागी होत होते पण उर्वरीत (१८.0%) बेरड लोक मात्र सामान्य सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये सहभागी होत नव्हते. सद्यपरिस्थितीचा विचार केल्यास असे दिसून येते की सामान्य सांस्कृतिक कार्यक्रम हे पूर्वी प्रमाणे जास्त प्रमाणात होत नाहीत त्याचप्रमाणे बेरड लोकांना त्यांच्या कामातून वेळही मिळत नसल्यामुळे ते सद्यपरिस्थितीत सामान्य सांस्कृतिक कार्य क्रमामध्ये सहभागी होत नाहीत.

### सद्यपरिस्थितीतील बेरड लोकांचा धार्मिक व्यवहार सण-उत्सव, कार्यक्रम याबाबतचा दृष्टीकोन :

बेरड समुदायातील लोकांना तुमच्या मते धार्मिक व्यवहार, सण-उत्सव, कार्यक्रम याबाबतच्या दृष्टीकोनामध्ये सद्यपरिस्थितीत बदल झाला आहे का? असा प्रश्न विचारला असता मिळालेल्या माहितीवरून असे दिसते की बहुसंख्य (८0.0%) बेरड लोकांचा धार्मिक व्यवहार सण-उत्सव कार्यक्रम याबाबतच्या दृष्टीकोनामध्ये बदल झालेला दिसतो परंतु उर्वरीत सर्वात कमी (२0.0%) बेरड लोकांच्या दृष्टीकोनामध्ये बदल झालेला नाही असे दिसते.

### बेरड लोकांची राजकीय जाणिव आणि सहभाग :

पूर्वीच्या परिस्थितीतील बेरड समुदायातील बेरड लोकांची राजकीय जाणिव आणि सहभाग पाहिल्यास खूपच असमाधानकारक परिस्थिती दृष्टीत्पोत्तीस येते. परंतु सद्यपरिस्थितीची

स्थिती पाहता निश्चितच बेरड लोकांची राजकीय जाणिव व आणि त्यामधील सहभाग याबद्दलच्या दृष्टीकोनामध्ये बदल झाल्याचे दिसते.

## बेरड समुदायावरील नागरी जीवनाचे परिणाम :

बेरड समुदायातील बेरड लोकांना तुमच्या समुदायामध्ये नागरी जीवनामुळे कोणते फायदे झाले आहेत? असा प्रश्न विचारला असता मिळालेल्या माहितीवरून असे दिसून येते की बेरड समुदायातील बहुसंख्य (६२.0%) लोकांच्या मते नागरीजीवनामुळे बेरड समुदायावर चांगले परिणाम झाले आहे तर उर्वरीत (३८.0%) बेरड लोकांच्या मते बेरड समुदायावर नागरी जीवनामुळे वाईट परिणाम झालेले आहेत.

## बेरड समुदायातील सामाजिक स्तरीकरणाचे स्वरूप :

पूर्वी बेरड समुदायातील सामाजिक स्तरीकरणाचे स्वरूप हे बेरड लोकांच्या उत्पन्नावरून ठरत असे परंतु सद्यपरिस्थितीत मात्र बेरड समुदायातील सामाजिक स्तरीकरणाचे स्वरूप हे बेरड लोकांच्या शिक्षणाच्या दर्जावरून ठरते.

## बेरड लोकांना गावातील उच्च वर्गातील लोकांच्या घरामधील प्रवेशाची स्थिती :

पूर्वी बेरड लोकांना गावातील उच्च वर्गातील लोकांच्या घरामध्ये प्रवेश दिला जात नव्हता. एकंदरीत बेरड समुदायातील बेरड लोकांशी गावातील इतर व्यक्ती संपर्क ठेवत नसत. पण सद्यपरिस्थितीत मात्र बेरड लोकांना गावातील उच्च वर्गातील लोकांच्या घरामध्ये प्रवेश दिला जातो, व गावातील इतर व्यक्तीही त्यांच्याशी संपर्क ठेवतात.

## बेरड लोक आणि सामाजिक मंडळे :

बेरड लोक पूर्वी सामाजिक मंडळांचे सदस्य होत नव्हते. त्यापाठीमागचे कारण म्हणजे त्यांच्यामध्ये समाज प्रबोधन झाले नव्हते तसेच त्यांना त्यामध्ये आवडही नव्हती. परंतु सद्यपरिस्थितीत मात्र बेरड समुदायातील बेरड लोक कोणत्याना कोणत्या तरी सामाजिक मंडळाचे सदस्य असलेले दिसतात.